# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दि. २७/१२/२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१६) इतिवृत्त

**बुधवार** दिनांक **२७ डिसेंबर २००६** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.३० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. गवळी रविकांत काशिनाथ
2. श्री. शिरसाट संजय पांडूरंग
3. श्री. पुनमचंद बमणे
4. श्री. साहेबराव कावडे
5. श्री. मधुकर सावंत
6. श्री. गायकवाड दिलीप नारायण
7. सौ. दलाल लता श्रीनिवास
8. डॉ. आशा बिनवडे
9. श्री. मुजीब आलमशाह खान
10. श्री. विनायक पांडे
11. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
12. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**विषय क्र.174 :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 106(3) अन्वये मुख्य लेखा परीक्षक यांनी सादर केलेल्या सन 2005-2006 च्या वार्षिक लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**संवाद :**

श्री.मुजेब खान : लेखा परीक्षण अहवालावरील चर्चा करण्या अगोदर इतर विषयावर चर्चेसाठी वेळ देण्यात यावा.

मा. सभापती : लेखा परीक्षण अहवाला व्यतिरिक्त चर्चा करू नये अशी विनंती आहे.

श्री.विनायक पांडे : ड्रेनेज, भांडार, विद्युत, बांधकाम इतर ही काही महत्वाच्या विभागाचे लेखा परीक्षण या अहवालात सादर झालेले दिसत नाही.

उपआयुक्त (म) : सन २००५-०६ या वर्षामधील एकूण ११ विभागाचे लेखा परिक्षण केले असून त्यामध्ये लेखा, आरोग्य, शिक्षण, जनसंपर्क, उद्यान, मालमत्ता, प्रभाग-ड, अग्निशमन, जकात, अस्थापना, नगररचना इत्यादी विभागांचे लेखा परीक्षण झाले असून एकूण १२७ आक्षेप आहेत. त्यापैकी १०७ अक्षेपांचे अनुपालन

संबधीत विभागाकडून प्राप्त झालेले आहे. वर्क सेक्शन, ड्रेनेज, नगररचना विभाग इत्यादीचे लेखा परीक्षण झालेले नाही.

श्री.संजय शिरसाट : उर्वरीत विभागांचे लेखा परीक्षण अहवाल का सादर झालेले नाही याचा खुलासा होणे अपेक्षीत आहे.

डॉ. आशा बिनवडे : सन २००४-०५ चे ऑडीट रिपोर्ट सादर केले त्यावेळीही काही विभागाचे ऑडीट रिपोर्ट आलेले नव्हते ते सादर करावे म्हणून निर्णय घेतलेला होता. त्या वर्षाचे लेखा परीक्षण अहवाल बाजूला ठेवून आज सन २००५-०६ या वर्षाचे ऑडीट रिपोर्ट समोर आलेले आहे तेही अर्धवट आहे. यापुर्वीच्या वर्षाचे ऑडीट रिपोर्ट सादर का झालेले नाही खुलासा व्हावा.

मा. आयुक्त : लेखा परीक्षण विभाग हे डायरेक्ट स्थायी समिती व सर्वसाधारण सभेच्या अखत्यारीमध्ये असते. मागील वेळेस काही संचिका प्राप्त झाल्या नाही म्हणून ऑडीट झाले नाही असे संबधीत अधिकारी यांनी म्हटले होते. त्यांना संचिका मिळाल्या की नाही, मिळाली नसेल तर संबधीत अधिकारी का देवू शकले नाही, दिली असेल तर ऑडीट का झाले नाही याचा संबधीत अधिकारी खुलासा करतील.

श्री.मुजेब खान : लेखा परीक्षण अहवाल संदर्भातील कोणकोणते अधिकारी आजच्या सभेला उपस्थित नाही. जेणे करून चर्चा केल्यास खुलासा मिळू शकेल किंवा मा.आयुक्त खुलासा देणार आहेत का?

मा. आयुक्त : मुख्य लेखा परीक्षकांचे पद सध्या रिक्त आहे. शासनाकडून अधिकारी प्रतिनियुक्तीवर आलेले झालेले नाही. सध्या अतिरिक्त कार्यभार उप आयुक्त श्री.कमलाकर फड यांचेकडे आहे. ते मा.महापौरांचे परवानगीने रजेवर गेलेले आहेत. त्यांना या बद्दल सर्व माहिती आहे. एक आठवडयानंतर संबधीत अधिकारी रजेहून येतील त्यानंतर ही सभा आयोजित करावी अशी विनंती राहील.

श्री.मुजेब खान : एक आठवडयानंतरच्या सभेत ज्या विभागाचे अहवाल आले नाही ते सुध्दा सादर करावे. मुख्य लेखा परीक्षक हे प्रत्येक वेळेस सांगतात की अमूक विभागाकडून संचिका मिळत नाही. असे का होते, यास कोण जबाबदार आहे. जकात बुक संदर्भात मी आपणाकडे चौकशीसाठी दिले होते त्याचे ऑडीट झाले नाही. संबधीत विभागास संचिकाच प्राप्त झाली नाही. माहितीची मागणी केल्यानंतरही इतर विभागाकडून लेखा परीक्षण विभागाला माहिती का पुरविली जत नाही. अशा विभागाचे प्रमाखांवर कार्यवाही झाली पाहिजे

श्री. रविकांत गवळी : सन २००३ पर्यतचा लेखा परीक्षण अहवाल सादर करून मंजूरी दिलेली आहे. ३१.५.२००६ रोजी सन २००४-०५ चा अहवाल सादर झाला त्यावेळी अहवाल अर्धवट आहे म्हणून चर्चा झाली. उर्वरीत विभागाचे अहवाल १५ दिवसात सादर करणार होते. त्यास ७ महिने झाले अद्याप अहवाल समोर आलेला नाही. सन २००५-०६ चा अहवाल येऊन ३ महिने झाले तोही अर्धवट आहे.

त्यावर चर्चा करण्यास हरकत नाही परंतू सक्षमपणे उत्तर कोण देणार आहे याचा खूलासा करावा.

मा. आयुक्त : पुढील आठवडयात ही सभा आयोज्ति करावी. जे की ज्या विभागाचे ऑडीट राहिले आहे ते का झाले नाही लेखा परीक्षण विभागाकडे विभाग प्रमुखानी संचिका का पाठविल्या नाही त्यांची ती जबाबदारी होती सर्व माहिती समोर येईल.

श्री. मधुकर सावंत : विभाग प्रमुखांनी संचिका दिल्या नाही म्हणून त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे याचा आयुक्ताकडून खूलासा घ्यावा.

मा. आयुक्त : विभाग प्रमुखांनी कोणतेही सक्षम कारण नसतांना संचिका दिली नसेल तर त्यांचेवर जबाबदारी निश्चित केली जईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे : सन २००४-०५ चा अहवाल मंजूर झालेला नाही तो होत नाही तो पर्यत हा अहवाल पास करण्याचा कोणताही अधिकार नाही.

श्री.रविकांत गवळी : सात महिण्यापूर्वी अर्धवट दिलेला अहवाल व तीन महिण्यापूर्वी दिलेल्या अहवालावर मा. आयुक्तांनी काय कार्यवाही केलेली आहे.

डॉ. आशा बिनवडे :विषय पत्रिका वाटप होवून ८ ते १० दिवस नक्कीच झालेले आहे. याची प्रशासनाला कल्पना असतांना मोठया प्रमाणात अधिकाऱ्याच्या रज मंजूर करणे आज पून्हा वेळ वाढवून मागणे योग्य नाही. ज्या विभाग प्रमुखानी गेल्या सात महिण्यात माहिती लेखा परीक्षण विभागाला दिली नाही त्या अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही करणार.

श्री.संजय शिरसाट : लेखा परीक्षण अहवालावर वादळी चर्चा व अधिकाऱ्यावर कार्यवाही होणार अशा बातम्या वृत्तपत्रात येत होत्या. २०४ पानाचा आजचा अहवाल सादर केला आणखी काही विभागाचे अहवाल यायचे बाकी आहे. यामध्ये प्रत्येक ठिकाणी अधिकाऱ्याना दोषी ठरविलेले आहे. संबधीत विभागाचे अधिकारी असते तर या विभागावर ताशेरे ओढतील म्हणून चिंता पडली असती परंतू ज्यांचेकडे अतिरिक्त कार्यभार आहे ते अधिकारी श्री. फड आठ दिवसानंतर होणाऱ्या या विषयावरील सभेत हेच म्हणणार आहेत की या संबधीची सविस्तर माहिती माझ्याकडे नाही. हा अहवाल मी तयार केलेला नाही. सन २००४-०५ चा अहवाल सादर केला अर्धवट होता म्हणून पुन्हा सादर न होता गुंडाळून ठेवला त्याच प्रमाणे त्यापुढील वर्षाचा आजचा अहवाल ठेवण्याचा प्रयत्न होत आहे. महापालिकेच्या संदर्भात नागपूर असेल मुंबई असेल विधान परीषदेत अनेक प्रश्न गाजतात. त्याचे सर्व दोष आरोप अधिकाऱ्यांवर गेलेले आहे. नगरपालिका किंवा महापालिकेत अनेक ठिकाणी नगरसेवकामुळे महापालिका बदनाम होते परंतु या महानगरपालिकेत अधिकाऱ्यांमुळे महापालिका बदनाम झालेली आहे. हा गंभीर विषय आहे. अनेक संचिका मिळत नाही. अनेक अधिकाऱ्यांनी उत्तरे दिली की संचिका गहाळ आहेत, सापडत नाही. अशावेळी प्रशासन काय ॲक्शन घेणार आहे. यापुर्वी मुख्य लेखा परीक्षक यांनी कर्मचारी वर्ग अपुरा असल्यामुळे काही विभागाचे लेखा

परीक्षण होवू शकले नाही म्हणून खुलासा केला होता. लेखा परीक्षक यानी जी सूचना मागच्या वेळी केली होती त्याची अंमलबाजावणी प्रशासनाने केलेली आहे काय जे विभाग सर्व विभागाची चौकशी करतो एक एक कागदपत्र तपासणी करतो त्यासाठी कर्मचारी देत नाही. याचा अर्थ एकीकडे आपण भ्रष्टाचारास पाठीशी घालत आहोत. वारंवार लेखा परीक्षणाची सभा तहकूब करावी लागते. सभा अधिकारी व नगरसेवकांच्या संगनमताने गुंडाळली अशी बातमी उद्या येवू शकते. त्यासाठी लेखा परीक्षण अहवालावर चर्चा होवून निर्णय घेतले पाहिजे मा. आयुक्त तसेच सर्व संबधीत अधिकारी याचा वेळ घेवून सभा आयोजित करावी व ठोस असे निर्णय घेण्यात यावे. जेणे करून महानगरपालिकेची बदनामी होणार नाही.

मा. आयुक्त : मागिल बैठकीत मागणी केल्यानुसार संबधीत लेखा परीक्षण विभागात दोन तीन कर्मचारी देण्यात आले. वरीष्ठ लिपीक देण्यात आले. यापेक्षा जस्त कर्मचारी देवू शकत नाही. टंकलेखन किंवा लिपीकाचे जस्तीचे काम असेल तर आऊटसोर्सने करून घ्यावे असे सजेशन दिले होते. सर्वच विभागाची कर्मचारी द्यावे अशी मागणी आहे वसूलीसाठी कर्मचारी दिले यापेक्षा जस्त कर्मचारी देवू शकत नाही. विभाग प्रमुख यांनी संचिका पाठविली नसेल , संचिका गहाळ झाली असेल तर विभाग प्रमुखाची जबाबदारी होवू शकेल. कोणत्या कारणाने संचिका दिली नाही त्या अधिकाऱ्याना जब विचारण्यास हे सभागृह सक्षम आहे.

श्री. संजय शिरसाट : सभागृह जब विचारू शकेल परंतू जेंव्हा ॲक्शन घेण्याचा प्रश्न येतो तेंव्हा मेमो देणे, निलंबीत करणे ही कार्यवाही तात्काळ झाली पाहिजे चूक केली तर समोर यावे लागेल असे वाटले पाहिजे नसेल तर ठिक आहे.

डॉ. आशा बिनवडे : पान क्र ३ वर लेखा परीक्षण विभागाने अतिशय महत्वाची सूचना प्रशासनास दिलेली आहे. महापालिका स्तरावर लेखा परीक्षण अहवालामध्ये विभागनिहाय व वर्षनिहाय प्रलंबीत असलेल्या परीच्छेदांची स्थिती व त्या बाबतचा निपटारा वेळोवेळी प्रशासनास उपलब्ध व्हावा यासाठी अंतर्गत व्यवस्था म्हणून मुख्यलेखाधिकारी यांचे अधिनस्त स्वतंत्र पथकाची स्थापना करणे गरजेचे वाटते. त्या दृष्टीने दि.१०.१.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीमध्ये ही बाब लेखा परीक्षक विभागाने प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. एक वर्ष झाले त्याकडे लक्ष न देता पथक स्थापन केले नाही ते केले असते तर अनेक विभागाच्या प्रकरणाचा निपटारा झाला असता. लेखा परीक्षक यांची सूचना प्रशासनास महत्वाची वाटली नाही काय याचा खूलासा करावा?

मा. आयुक्त : जे पथक करायचे आहे त्याच स्टाफमधून करावे म्हणून सूचना केली होती. नव्याने कर्मचारी देण्यासाठी नवीन पद मंजूर होत नाही तो पर्यत देणे शक्य नाही.

श्री. संजय शिरसाट :जेवढे मागणी केले तेवढे कर्मचारी दिलेले नाही.

मा. आयुक्त : दोन तीन कर्मचारी दिलेले आहे यापेक्षा जस्त कर्मचारी देणे शक्य नाही.नवीन जेंव्हा पद मंजूर होवून येतील तेंव्हा तेथील कर्मचारी यांना जस्त प्राधान्य दिले जईल.

सौ. लता दलाल :जेंव्हा केंव्हा बैठक असेल त्यावेळी संबधीत अधिकारी उपस्थित असणे आवश्यक आहे. नसता त्यांचेवर कार्यवाही व्हावी. तसेच या सभागृहाने निर्णय घेतल्यानंतर अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्याची कार्यवाही प्रशासनाने केली पाहिजेअशी सूचना आहे.

श्री.मुजीब खान :अतिक्रमण विभागाचा प्रश्न होता. दुसऱ्यादा श्री. संगेवार त्या विभागामध्ये येवू नये म्हणून अशी मागणी होती तरी आले. सर्वसाधारण सभेत निर्णय झाला सर्वांना हटवावे. परंतू संगेवार यांना बदली केली नाही.

मा. आयुक्त : त्याची बदली केलेली आहे. परत अतिक्रमण विभागात आलेले नाही.

श्री.मुजीब खान : अतिक्रमण विभागात ते काम करीत आहे. चेलीपूरा भागात येवून त्यांनी डिमांड केलेली आहे त्याचा पुरावा आहे. आपण बदली केली पुन्हा त्यांची बदली रद्द केली वृत्तपत्रात आले. ८० वर्षाची महिला त्या महिलेच्या व दोन मुलाच्या नावाने पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद केला दोघेही सरकारी नोकर आहे. संगेवार हे अतिक्रमण विभागात नसतांना त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद केला, याचा खूलासा करावा.

मा. आयुक्त :सर्व इमारत निरीक्षकाच्या बदल्या केलेल्याआहेत. संगेवार यांची सूध्दा बदली केली. त्यांना कोर्ट प्रकरणा बध्दल माहिती असल्यामूळे ७ दिवस पार्ट टाईम त्या विभागात काम करावे म्हणून सूचना दिल्या होतया. तीन दिवस गेले तीन दिवसात त्यांना पूर्ण वेळ दुसऱ्या विभागात काम दिले जईल.

श्री.मुजीब खान : न्यायालयाच्या संदर्भातील सर्व माहिती विधी सल्लागार यांचेकडे राहते. इमारत निरीक्षक यांचेकडे नसते. चुकीची माहिती आपल्या निदर्शनास आणून दिली व त्यांना थांबून ठेवले. संबधीत कर्मचारी हे बेकायदेशीर रित्या लोकाकडून वसूली करतात त्याची त्वरील बदली करावी.

मा. आयुक्त : ठिक आहे, श्री. संगेवार यांचेकडे अतिरिक्त चार्जआहे तोही आजपासून काढला जईल.

मा. सभापती : लेखा परीक्षण अहवालावर आजची बैठक होती. सर्व सदस्य आजच्या विषया संदर्भात अभ्यास करून आलेले होते. सर्वांना बोलण्याची इच्छा होती. अधिकारी उपस्थित नसल्यामुळे चर्चा होवू शकली नाही खेदाची बाब आहे. ही बैठक पुढे घेण्यात यावी असे विनंती प्रशासनाने केलेली आहे. येत्या १० तारखेला या विषयावर बैठक आयोजित केली जईल.मा. आयुक्तांनी कोणत्याही अधिकाऱ्याची कोणत्याही कारणासाठी त्या दिवशीची रज मंजूर करू नये. सर्व अधिकारी उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी. अनुकंपा भरती संदर्भातही १० तारखेलाच चर्चा करून निर्णय घेतला जईल.

या बरोबरच आजची सभा राष्ट्रगितानंतर तहकूब करण्यात आल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि. १२/१/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१६) इतिवृत्त**

**शुक्रवार** दिनांक **१२ जानेवारी २००७** रोजी (**दि. २७-१२-२००६ रोजीची तहकूब सभा**) स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.५० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. गवळी रविकांत काशिनाथ
2. श्री. शिरसाट संजय पांडूरंग
3. श्री. पुनमचंद बमणे
4. श्री. साहेबराव कावडे
5. श्री. मधुकर सावंत
6. श्री. गायकवाड दिलीप नारायण
7. सौ. दलाल लता श्रीनिवास
8. डॉ. आशा बिनवडे
9. श्री. मुजीब आलमशाह खान
10. श्री. मिलींद दाभाडे
11. श्री. विनायक पांडे
12. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
13. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**विषय क्र.174 :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 106(3) अन्वये मुख्य लेखा परीक्षक यांनी सादर केलेल्या सन 2005-2006 च्या वार्षिक लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**संवाद :** *....विषय क्र.174 वरील चर्चा पुढे चालू .......*

मा. सभापती : आजची सभा ही तहकूब सभा आहे चर्चा करावी.

श्री. मुजेब खान : आजच्या सभेला मा.आयुक्त तसेचउपआयुक्त उपस्थित नाही. या अहवालात एक ही पान असे नाही की लेखा परीक्षणाचा अहवाल क्लिअर आहे. अनेक दिवसापूर्वी हा अहवाल आलेला आहे या संदर्भात प्रशासंनाने किंवा मा. महापौर मा. सभापती दोषी वर कार्यवाही करण्या संदर्भात बैठक घेतलेली आहे की नाही. यात क्लिअर दोषी असल्याचे म्हटलेले आहे.

श्री.संजय शिरसाट : मा. आयुक्त सभागृहात नाहीत. सभा थोड्या वेळासाठी तहकूब करावी.

मा. सभापती : या अहवालावर सविस्तर चर्चा व्हावी . दोषींना शिक्षा व्हावी परंतू मा. आयुक्त सभागृहात आलेले नाही. अर्ध्या तासासाठी सभा तहकूब करण्यात येते मा.आयुक्त कार्यालयात आले असतील तर त्यांना लगेच बोलविण्यात यावे. (वेळ ११.५० वा. पून्हा सभेला सुरूवात १२.१५ वा.)

याच वेळी मा. आयुक्त सभागृहात उपस्थित होतात.

श्री.मुजेब खान : या अहवालानुसार दोषी अधिकाऱ्यावर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे. अनेक दोषी असल्याने नमूद केले आहे. काही कडून पैसे वसूल झालेले नाही यापूर्वी ही दोन वेळेस लेखा परीक्षणावर चर्चा झालेली होती. मा. सभापती यांनी दोषीवर कार्यवाही करण्याचे आदेशीत केले होते. कार्यवाही केली किंवा काय याची माहिती आम्हा सदस्यापर्यत आलेली नाही. राजकारण करणे लोकप्रतिनिधीचे काम असते परंतू अधिकारी राजकारण करतात प्रशासन मा. महापौर मा. सभापती विकास कामाचे घ्येय ठेवत असले तरी खालचे अधिकाऱ्यानी ठेवले नाही तर विकास कामे होवू शकणार नाही. या बध्दल प्रशासनाची भुमिका काय आहे याचा प्रथम खूलासा होणे अपेक्षीत आहे.

श्री.रविकांत गवळी : अहवाल येवून चार महिने झाले. मा. सभापती सर्व स्थायी समितीच्या सदस्यांना अहवाल दिलेला असून मा. आयुक्त यांना ही दिलेला आहे. दोषीवर मा. आयुक्तांनी काय कार्यवाही केली.

श्री.मो.जवेद मो. इसाक : या लेखा परीक्षण अहवालामध्ये जे ही अधिकारी कर्मचारी दोषी आहे त्यांचेवर तात्काळ कार्यवाही होणे गरजेचे आहे.

श्री. मधुकर सावंत : स. सदस्यांची भावना योग्य आहे. या अहवालावर चर्चा होईल परंतू प्रशासन दोषीवर कार्यवाही करीत असेल तरच चर्चा करण्याला अर्थ आहे.

मा. आयुक्त : एक एक पॉईन्ट नुसार चर्चा करावी व निर्णय घ्यावा नियमाने कार्यवाही होईल.

श्री.मुजेब खान : यापूर्वीही कार्यवाही करण्या संदर्भात अनेक वेळा निर्णय झालेले आहे कार्यवाही केलेली नाही. दीड वर्षात आमच्या बोलण्यावर कार्यवाही झाली नाही. अनेक प्रकरणाच्या चौकशी नियुक्त केली. किती अधिकारी कर्मचारी यांचेवर कार्यवाही केली अद्याप आम्हाला माहिती दिली नाही.

सौ. लता दलाल : जमा किती व खर्च किती झाला. खर्च जस्त झाला असेल तर कोठून आणले याचा यात उल्लेख नाही. माहिती द्यावी.

डॉ.आशा बिनवडे : लेखा परीक्षण अहवाल कशा पध्दतीने तयार केला जतो याची माहिती थोडक्यात द्यावी.

मा. सभापती : श्री. फड साहेब यांनी या संबधी खूलासा करावा.

प्र.मुख्य लेखा परीक्षक : लेखा परीक्षण करतांना वार्षीक नियोजन अगोदर ठरवले जते. प्रत्येक विभागास पत्र देवून त्यांचे विभागातील संचिका तयार ठेवण्यास कळविण्यात येते. संचिका तपासून अक्षेप काढले जतात. काही हाफ मार्जेनचे अक्षेप असतात ते काढून संबधीत विभागाला कळविले जते. त्या अक्षेपाची पूर्तता केली व ते मान्य असेल तर तो मान्य केला जतो. नसता अक्षेपाचे उत्तर दिले नाही म्हणून लेखा परीक्षण अहवालात येते.

श्री.मुजेब खान : जेवढे बजेट असते. त्यानूसार किती रक्कम येणे बाकी आहे याचा उल्लेख कूठे ही केलेला नाही.पाच ठिकाणी असे नमूद केले आहे की संचिका दिल्या जत नाही. या संदर्भात मा. आयुक्त मा. महापौर मा. सभापती यांचे निदर्शनास हे आणून दिलेले आहे का, लेखा परीक्षक अहवाल तयार करण्यास अडचण येत आहे.

डॉ. आशा बिनवडे : ज्या ज्या विभागाकडून अहवाल आले असतील ते समाधान कारक नसेल तर ते एकत्रित करून प्रशासनाकडे दयायला पाहिजे होते त्या संदर्भात कार्यवाही झाली असती.

सौ. लता दलाल : लेखा परीक्षण कूणी केले. ज्यांचेकडे सध्या ऑडीटर म्हणून चार्ज आहे तो केंव्हापासून आहे. त्यांना माहिती नसेल तर असीस्टंन्ट कडून माहिती घेवून या सभागृहाला सविस्तर माहिती द्यावी.

प्र.मुख्य लेखा परीक्षक : तीन महिण्यापूर्वी साधारणत: श्री. औताडे यांची महापालिकेतून बदली झाली होती. त्यांचा अतिरिक्त पदभार माझ्याकडे दिलेला आसून या विभागात श्री.अभंग हे कार्यालयीन अधिक्षक आहेत तसेच लेखा परीक्षक म्हणून श्री.पैठणे असून त्यांचे अधिनस्त इतर कर्मचारी काम करतात. श्री. पैठणे हे आजसभागृहात उपस्थित आहेत.

डॉ. आशा बिनवडे : आताच श्री. पैठणे यांनीच वार्षिक लेखा परीक्षण अहवाल सन २००५-२००६ मधील प्रलंबीत व वगळण्यात आलेल्या अक्षेपांचे विवरण आताच सर्वाना दिले आहे. यात पाच ते सहा अक्षेप सोडले तर कोणतेही अक्षेप वगळण्यात आलेले नाही. जशाच्या तसे प्रलंबीत आहे. याचा अर्थ संबधीत विभागाने केलेला खुलासा हा असमाधानकारक असल्यानेच वगळले नाही.

प्र. मुख्य लेखा परीक्षक : कालच शिक्षण विभागाचे एक अक्षेप बाबत उत्तर आले ते मान्य करून वगळलेले आहे.

डॉ. आशा बिनवडे : १२७ मधून आठ अक्षेप वगळले ११९ तसेच आहे.

श्री.मुजीब खान : जेंव्हा लेखा परीक्षण होते. त्यात बजेटचा उल्लेख यायला पाहिजेतसेच जेंव्हाही अहवाल येतो पूर्ण विभागाचे लेखा परीक्षणाचा अहवाल सादर होत नाही. यात अनेक विभागाचे लेखा परीक्षण अहवाल सादर झालेले नाही.

मा. सभापती : एक एक अक्षेपावर चर्चा करावी. कोणकोणत्या विभागाचा अहवाल आलेला नाही याचाही खुलासा करावा.

प्र. मुख्य लेखा परीक्षक : वार्ड फ चे सन २००२ ते २००५ पर्यतचे तसेच वार्ड अ, ब, यांत्रिकी विभागाचे लेखा परीक्षण पूर्ण झाले आहे. पाणीपूरवठा १-२ स्लम , विद्युत -१,२ लेखा परीक्षण चालू आहे. रस्ते विभागाचे लेखा परीक्षण झालेले असून ८-१० दिवसात अहवाल दिला जईल. ड्रेनेजनगर रचना विभागाचे चालू आहे फेब्रुवारी पर्यत तांत्रिक विभागाचे लेखा परीक्षण पूर्ण होईल.

श्री.मधुकर सावंत : पान क्र ७ वर ६ नं. कॉलम आहे यात नगररचना विभागाचे अस्थापना खर्च १.१८ कोटी. तेवढयाच प्रमाणात महापालिकेला उत्पन्न होते की नाही.

मा. सभापती : प्रत्येक विभागाचे ऑडीट या सभागृहासमोर लवकरात लवकर कसे येईल यासाठी कार्यवाही करावी.

डॉ. आशा बिनवडे : प्रत्येक विभागास मर्यादीत कालावधी द्यावा. ऑडीट करून घ्यावे.

श्री.मधुकर सावंत : मा. आयुक्त दोषीवर कार्यवाही करतील अशी अपेक्षा धरून चर्चा करीत आहे. पान क्र ६ वर अ मध्ये असे दिले की ,महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये महापालिकेचे अपेक्षीत उत्पन्न व खर्च याचा अंदाजपत्रक प्रत्येक वर्षी तयार करण्यात येते सन २००४-५ व २००५-०६ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय तरतूदी व प्रत्यक्ष जमा खर्च आणि महापालिकेद्वारे करण्यात आलेला प्रत्यक्ष खर्च हा अर्थसंकल्पी तरतूदी पेक्षा १० ते २५ टक्के कमी अथवा जस्त झालेला आहे. त्या

बाबतचा तपशील खालील प्रमाणे नमूद केलेला असून वर्ष २००४-२००५ या मध्ये १८५. ११ कोटी होता.

डॉ. आशा बिनवडे : उत्पनाचे उद्दीष्टा पेक्षा मागिल वर्षी खर्च जस्त झाला दुसऱ्या वर्षी उत्पन्न अधिक असतांना खर्च कमी करून शिल्लक ठेवलेली आहे. ४६ कोटी शिल्लक दाखवले खर्च केले नाही मागिल वर्षी स्पील ओव्हरमध्ये गेले.

मा. आयुक्त :३१ मार्च पूर्वी शासनाकडून २५ कोटी तर सिडकोकडून १५ कोटी असे ४० कोटी मिळाले ते जमा मध्ये आले.या वर्षी जमा कमी होईल सुरूवातीला शिल्लक जस्त राहिल खर्च जस्त दिसेल.

श्री.विनायक पांडे : पान क्र ६ वर ब व क मध्ये दोन प्रकरणाबाबत अधिकारी आणि पदाधिकारी कर्मचारी यांचेकडील प्रलंबीत अग्रीम रक्कम व लेखा विभागाकडे विना तजविज परत आलेल्या धनादेशा बाबत. प्रलंबीत अग्रीम रक्कमेचे १८० व न वटलेले धनादेशाचे २८० प्रकरणे आहेत. या संदर्भात काय कार्यवाही केलेली आहे.

मा.सभापती : लेखाधिकारी यांनी खूलासा करावा.

लेखाधिकारी : सन २००५-०६ मध्ये ३१.३२ लक्षचे अग्रीम देण्यात आलेले होते. त्यापैकी १५.५४ लक्षचे समायोजन झालेले आहे. १५.७० लक्षचे ॲग्रीम समायोजन होणे बाकी आहे. ज्यांचेकडे अग्रीम बाकी आहे त्यांना नोटीस देण्यात येणार आहे. जेकर्मचारी आहे त्याचे वेतन थांबविण्यात आले आहे. जे समायोजन करणार नाही त्यांना वेतन दिले जणार नाही.

मा. सभापती : नोटीस दिलेले आणि वेतन ज्यांचे थांबविलेले आहे दोन्हीबध्दल खूलासा करावा.

लेखाधिकारी : जे कर्मचारी आहे त्यांचे वेतन थांबविले पदाधिकारी यांना सूध्दा समायोजन करावे म्हणून नोटीसेस देण्यात आलेल्या आहे. यात ७२ कर्मचारी यांचेसह पदाधिकारी आहेत. जेवढे कर्मचारी आहे त्यांचा १०० टक्के पगार थांबविलेला आहे.

डॉ. आशा बिनवडे : श्री. मालोदे यांनी जलतरण तलावासाठी बऱ्याच मोठया रक्कम ॲग्रीम घेतलेल्या आहेत. त्यांचे समायोजन केले काय व कोणत्या कामासाठी व कशा पध्दतीने खर्च केले याची पण माहिती दयावी. यात अनेक ठिकाणी शालेय स्पर्धा असे दिले कोणत्या स्पर्धा घेतल्या कुठे घेतल्या प्रत्येक स्पर्धावर किती खर्च झाला बॅडमिटंन टेबल टेनिस यास्पर्धा केंव्हा झाल्या.

लेखाधिकारी : क्रिडा स्पर्धासाठी ॲडव्हॉन्स दिलेले होते. समायोजन करणे प्रलबीत आहे.त्याचे दोन महिण्यापासूनचे पगार थांबविलेले आहे. माझ्या स्तरावर नोटीस पण दिलेली आहे.

डॉ. आशा बिनवडे :एका दिवसात दोन वेळेस ॲडव्हॉन्स घेतलेले आहे. शालेय स्पर्धासाठी अग्रीम घेतले कोणत्या स्पर्धासाठी घेतले त्या झाल्या की नाही. कुठे झाल्या याचा खूलासा करावा. काही ठिकाणी नुसते कार्यालयीन कामासाठी असे दिलेले आहे हे शिषर्क लक्षात येत नाही.

डॉ. आशा बिनवडे : महापौर चषकसाठी एक लक्ष उचलले आहे. कशासाठी ॲडव्हॉन्स दिलेले आहे.

मा. आयुक्त : कर्मचारी असेल तर यात यावे खाजगी ठिकाणी कधी कधी ॲडव्हॉन्स द्यावे लागते ते यात यायला नको, असे किती लोक आहे.

लेखाधिकारी : त्याची यादी तपासून सभागृहाला सादर केली जईल.

श्री.मधुकर सावंत : चार महिण्यापूर्वी हा अहवाल आम्हा सदस्यांना दिला. अधिकाऱ्यानाही मिळाला असेल आता तपासणी करून उत्तर देणार असेल तर बरोबर नाही.

डॉ. आशा बिनवडे : पल्स पोलीओ साठी मोठ मोठी अग्रीम दिली गेली समायोजन झालेले नाही.

मा. सभापती : ज्यांचेकडे समायोजन करणे बाकी आहे त्यांना सूचना करून आठ दिवसात करून घ्यावे समायोजन केल्या शिवाय त्या त्या कर्मचाऱ्याना पून्हा अग्रीम देवू नये.

श्री.विनायक पांडे : २८० धनादेश वटलेले नाही.

मा. आयुक्त : समायोजन केले नाही म्हणून पगार रोखले आहे. यात एक वर्षापूर्वीच्या ही केसेस आहे. एक वर्ष समायोजन करीत नसेल तर त्यांचेवर निलंबणाची कार्यवाही होईल.

श्री.संजय शिरसाट :पान क्र १३ वर अण्णा वाघ यांना ८६ हजर ॲडव्हॉन्स दिला त्यांचे पदनाम काय आहे. तसेच आरोग्य विभागातील नोंदणी लिपीक श्री.गायकवाड यांचे नावाने १५, ३०, ४० हजर पर्यत ॲडव्हॉन्स आहे. ॲडव्हॉन्स देतांना त्या कर्मचाऱ्याची जबाबदारी फिक्स असते. जबाबदार व्यक्तीलाच ॲडव्हॉन्स दिले पाहिजे

लेखाधिकारी : श्री. वाघ हे कॅशीयर आहेत. त्यांनी समायोजन केले आहे. हा अहवाल पूर्वीचा आहे. यात ८० टक्के समायोजन झालेले आहे.

श्री.संजय शिरसाट : जबाबदार कर्मचाऱ्यांना ॲडव्हॉन्स द्यावा.

मा. सभापती : येत्या आठ दिवसात सर्व उर्वरीत समायोजन करून घ्यावे ज्यांनी केले नाही त्यांचेवर तात्काळ कार्यवाही करावी अशा सूचना देण्यात येत आहे.

मा. आयुक्त : ज्या कर्मचाऱ्यानी समायोजन केले नाही त्याची यादी स्थायी समितीकडे दिली जईल.

श्री.संजय शिरसाट : आरोग्य विभागात पी. आर गायकवाड यांचे अनेक ठिकाणी कार्यालयीन कामासाठी म्हणून ॲडव्हॉन्स घेतलेले आहे.

लेखाधिकारी : त्यांनी पूर्ण समायोजन केले आहे.

श्री. मधुकर सावंत : पान क्र ७ क मध्ये सर्व प्रभाग कार्यालय मालमत्ता व जकात विभागाचे एकूण २८० धनादेश वटलेले नाही. त्यापोटी २६.४८ लक्ष रक्कम येणे आहे. मागे मालमत्ता विभागाचा एक चेक वटलेला नव्हता म्हणून संबधीत अधिकारी यांना आयुक्तांनी निलंबीत केले होते. यात नमूद केल्या प्रमाणे जे न वटलेले धनादेश आहे त्या विभाग प्रमुखावर तसेच ज्यांनी ते धनादेश दिले त्यांचेवर मा. आयुक्तांनी आतापर्यत काय कार्यवाही केलेली आहे.

मा. आयुक्त : वार्ड कार्यालय-अ मधील या बाबतची स्थिती काय आहे . माहिती द्यावी.

लेखाधिकारी : वार्ड कार्यालय अ मधील ६ चेक असून त्यातील रक्कम १.११ लक्ष रू. आहे. वार्ड अधिकारी यांना या संदर्भात चौकशी करावी म्हणून दोन तीन वेळेस पत्र दिलेले आहे.हे मालमत्ता कराच्या संदर्भात चेक आहे. संबधीतांना सात दिवसाची नोटीस दिलेली होती. त्यापैकी २० हजर वसूल झालेले आहे.

मा. आयुक्त : ज्यांनी मालमत्ता कराच्या संदर्भात धनादेश दिले त्या मालमत्तेस आजपासून सिल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

श्री.मधुकर सावंत : २८० बोगस धनादेश पैकी एका धनादेश संदर्भात आयुक्तांनी कार्यवाही केली अभिनंदन आहे परंतू मा. आयुक्तांनी काळया गोऱ्याचा भेदभाव केला आहे. वॉर्ड फ

मधील भ्रष्टाचारासंबंधी विधान सभेत तारांकीत प्रश्न उपस्थित झाला तरी काहीही कार्यवाही केली नाही.

मा. आयुक्त : पक्षपाती पणाची, तसेच कोण काळे कोण गोरे, कोण चांगले कोण वाईट हे बघून प्रशासन कार्यवाही करीत नसेल. जे दोषी आहे त्यांचेवर कार्यवाही होत असते.

श्री. मुधकर सावंत : वॉर्ड फ मधील जे कर्मचारी काम करीत होते त्यानी मोठा भ्रषटाचार केला त्यांचेवर कोणतीही कार्यवाही केली नाही वार्ड क मध्ये वार्ड अधिकारी व संबधीत कर्मचारी या दोघानांही निलंबीत केले. २७९ चेकच्या संदर्भातील झोन अधिकारी यांना का निलंबीत केले नाही.

श्री.संजय शिरसाट : चेक बाऊन्स झाल्यानंतर १३८ ची नोटीस द्यावी लागते ती केंव्हा दिली होती. वेळेत दिली नसेल तर आजदबाव टाकून घराला सील करू शकत नाही.

मा.आयुक्त :ज्याचा चेक बाऊन्स झाला त्यांचेवर गुन्हे दाखल करता येतात. प्रोसेसनुसार तर कार्यवाही होईल. चेक त्यांनी दिला थकबाकीदार तो आहे गुन्हा दाखल करू शकतो. गुन्हा दाखल केल्यानंतर कोर्ट च्या प्रोसेसनुसार कार्यवाही केली जईल. ज्या अधिकाऱ्यांनी नोटीस दिली नाही त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल.

श्री.मधुकर सावंत : कार्यवाही करायची असेल तर सर्वावर करावी.

मा. आयुक्त : मालमत्ता विभागात चेक दिल्यानंतर सहा महिनेबॅंकेत पाठविला नव्हता संबधीत व्यक्तीनी पैसे वसूल केले ते महापालिकेला मिळालेले नव्हते.

श्री.संजय शिरसाट : एखाद्या मालमत्ता धारकाने धनादेश दिला तो वटला नाही तर कायदेशीर प्रोसेस काय असते. विधी सल्लागार यांचेकडून माहिती घ्यावी.

विधी सल्लागार : धनादेश दिल्यानंतर तो लगेच बॅकेत पाठवावा लागतो. न वटल्यास १५ दिवसाच्या आत संबधीतास नोटीस सात दिवसात पैसे भरावे म्हणून कळवावे लागते. दिलेली नोटीसची अट पूर्ण केली नाही तर ५० दिवसाच्या आत १३८ केसेस दाखल करू शकतो. एखाद्या प्रकरणात उशीर झाला तरी सिव्हील सूट दाखल करू शकतो. तीन वर्षाची त्या बाबतची अट आहे.

श्री.संजय शिरसाट : धनादेश वटवला नाही म्हणून किती लोकांना नोटीसेस दिलेल्या आहे.

मा. आयुक्त : जे प्रोसेस होती त्याचे पालन का झाले नाही याची खात्री करून घ्यायला पाहिजे ज्यांनी प्रासेस प्रमाणे कार्यवाही केली नाही अशा अधिकाऱ्यावर कार्यवाही होणे अपेक्षीत आहे परंतू धनादेश जे देतो तो बॉन्स होतो याचा अर्थ समोरच्या व्यक्तीने चेक घेणारास मुर्ख बनविले आहे. चेक न वटला तरी त्या व्यक्तीच्या मालमत्तेवर महापालिकेची थकबाकी आहे हे सिध्द होते. १० ते १५ लक्षची थकबाकी असेल तर त्याची प्रोसेस केंव्हाही सुरू करू शकतो. सर्व मालमत्ताना सील व्हायला पाहिजे कर भरणा केला नाही तर सील होते हे लोकांना कळले पाहिजे सर्वावर सिव्हील सूट दाखल करावे. थकबाकीची नोटीस दिलेली आहे त्या अधारे १५ दिवसानंतर लिगल कार्यवाही करता येते.

मा. सभापती : या विषयावर विविध मुद्दे स. सदस्यांनी उपस्थित केले. मागिल वर्ष भरात जे प्रकरण घडलेले आहे त्यावर कार्यवाही करणे आवश्यक आहे. र्वाड अधिकारी यांना नोटीस देवून थकबाकीदारांच्या संदर्भात काय कार्यवाही केली याची माहिती घ्यावी. केली नसेल तर का केली नाही याची विभागीय चौकशी करून त्यांचेवर कार्यवाही करावी.

| | |
|---|---|
| श्री.मुधकर सावंत | : चार महिण्यापुर्वीचा अहवाल आहे. सभागृहाने निर्णय घेतल्यानंतरच कार्यवाही होणार. मा.आयुक्तांनी का कार्यवाही केली नाही. |
| लेखाधिकारी | : या संदर्भात मा.आयुक्त यांनी विभागीय अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीसेस देवून वसूली करावी व वसूली न केल्यास खातेनिहाय चौकशी करण्यात येईल म्हणून नोटीसेस दिलेल्या आहे. |
| श्री.संजय शिरसाट | : लेखाधिकारी यांनी तीन वेळेस नोटीसेस दिल्या त्यास अधिकारी यांनी जुमानले नाही म्हणून मा. आयुक्तांच्या सहीने शेवटी नोटीस देण्यात आली. |
| मा. आयुक्त | : लेखाधिकारी यांनी नोटीस दिली. पुर्वीपासून या बाबत कार्यवाही होत आहे. अनेक वेळा असे होते की मार्चच्या शेवटी काही लोक धनादेश देतात. परंतू ते वटवले जत नाही. त्यामूळे परत मागणी केल्यास जुन जुलै मध्ये पैसे घ्यावे असे नागरीकांचे म्हणणे असते. |
| श्री.मधुकर सावंत | : ज्यांचे चेक बॉन्स झाले त्यांचे नळ कनेक्शन असेल बंद करावे. किंवा मालमत्ता असेल त्या बाबतीत कार्यवाही करावी. व ज्या अधिकाऱ्यानी या कामात दिरगांई केलेली आहे त्याची एक वेतनवाढ थांबवावी. वेळेत कर वसूली केली नाही तर निलंबनाची कार्यवाही करावी अशी ताकीत देण्यात यावी. |
| मा. सभापती | : ज्या व्यक्तीनी धनादेश दिला तो बाऊन्स झाला असेल तर त्यांचेवर कार्यवाही करावी. |
| मा. आयुक्त | : चेक न वटलेल्यावर लिगल कार्यवाही अगोदर होईल तसेच थकबाकी आहे म्हणून मागिल वर्षी ज्यांचेकडे थंकबाकी असेल त्यांना नोटीसेस दिलेल्या आहे. त्यांचे आजच नळ कनेक्शन श्री.डी.पी. कुलकर्णी यांनी कट करावे उद्या ११ वाजेपर्यत माझेकडे रिपोर्ट द्यावा. |
| मा. सभापती | : २७९ लोकांचे चेक बाऊन्स झाले आहेत. त्यांचेवर त्वरीत कार्यवाही करावी. |
| श्री. रविकांत गवळी | : कर्जफेड चार प्रकरणात २.९२ कोटी दिले औरंगाबाद पाणी पुरवठा मंडळाचे ५५ लक्ष होते. त्यास व्याजसहीत १.५७ कोटी दिले. |
| लेखाधिकारी | : दीर्घमुदतीचे २० वर्षासाठी कर्जघेतलेले आहे. त्यामुळे त्याचे व्याजकॅल्क्यूलेट करून केलेले आहे. मुद्दल ५.५६ कोटी व्याजसहीत १० कोटी द्यायचे आहे. |
| मा. सभापती | : कमी व्याजदराने कर्जघेता येते का हे बघावे. |
| मा.आयुक्त | : २० वर्षापूर्वीचे कर्जआहे. यावर व्याजजस्त आहे. |
| श्री.रविकांत गवळी | : पान क्र ७ वर ३१२ कोटीचे देणे आहे. येणार कीती ते दिले नाही. |
| श्री.संजय शिरसाट | : क्र ७ वर आहे महाराष्ट्र डिस्टीलरी ३.३२ कोटी दयावयाचे आहे. महापालिका जस्त जकात घेत होती त्या कंपनीने असे म्हणणे मांडले आहे. कोर्टात प्रकरण आहे.न्यायालया समोर महानगरपालिकेचे वकील हजर नव्हते त्यामूळे मनपा विरूध्द निकाल आला. की संबधीत कंपनीला टप्प्या टप्प्याने पैसे देण्यात यावे. महापालिकेने रिव्हीजन पिटीशन केले. नाही. अनेक वेळा वकील गैरहजर राहिले. |
| मा. सभापती | : संबधीत कंपनी विरूध्द रिव्हीजन पिटीशन दाखल करू शकतो काय याचा अभ्यास करून कार्यवाही करावी. |
| विधी सल्लागार | : या कंपनीकडून महापालिका सुरूवातीस १.५ टक्के प्रमाणे जकात घेत असे नंतर ५ टक्के दराने जकात घेण्यास प्रस्तावित केले होते. त्या विरूध्द कंपनीने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. ती याचिका न्यायालयाने फेटाळली. त्यानंतर |

सर्वोच्च न्यायालयामध्ये स्पेशल रिव्हु पिटीशन दाखल केले. त्यामध्ये स्थगिती आदेश न मिळाल्यामूळे महापालिकेने कंपनीकडून फरकाची रक्कम वसूल केली अंतिम सुनावणी नंतर न्यायालयाने महाराष्ट्र डिस्टीलरी ला २ टक्के दराने जकात वसूल करावी असा निकाल दिला होता. त्या अधारे या कंपनीने ३ टक्के फरकराची रक्कमेची मागणी केली. स्पष्ट उल्लेख नसल्यामूळे ते विचारात घेतले नाही. त्यानंतर कंपनीने पून्हा न्यायालयाकडे विनंती केली. महापालिकेने वसूली केलेली फरकाची रक्कम वसूल करण्याचे डायरेक्शन दयावे. मा. कोर्टाने पैसे जमा करावे म्हणून महापालिकेला आदेशील केले. हा निकाल दिल्यानंतर त्याच वेळी मा. सर्वोच्च न्यायालयात महापालिकेने रिव्हू पिटीशन दाखल केलेले आहे. या कंपनीने फरकाची जी रक्कम आहे ती नागरीकांकडून डायरेक्ली वसूल केली आहे असे प्रतिपादन मा. न्यायालयासमोर मांडलेले आहे. यात वेगवेगळया न्यायालयीन निवाडयाचा संदर्भ घेवून ही रक्कम हप्त्याने महापालिकेने कंपनीला दयावी असे आदेशीत केलेले आहे.

श्री. संजय शिरसाट : मा.उच्च न्यायालयात कंपनी विरूध्द निकाल दिला होता. सर्वोच्च न्यायालयात प्रकरण गेले. तेथे महापालिकेचे वकील हजर नव्हते. त्यावेळी मा. आयुक्त शैलेशकूमार शर्मा हे होते. विधी सल्लागार यांचेशी त्यांनी चर्चा ही केली होती. व ७ कोटी रू. दयावे लागतील असे म्हटले होते. रिव्हीजन पिटीशन दाखल झाल्यानंतर महानगरपालिकेचे वकील तेथे हजर नव्हते. त्यामूळे निकाल विरोधात गेला आहे.

विधी सल्लागार : श्री. बिर्ला नावाचे वकील हजर होते. जेंव्हा निकाल विरोधात गेला तेंव्हा रिट पिटीशन दाखल करण्यासाठी जेष्ठ ॲड. हरीष साळवे यामार्फत केले आहे.टॅक्सेस बाबत नामांकित वकील होते त्यांनी युक्तीवाद केला.

श्री.मधुकर सावंत : पान क्र.७ वर ३ मध्ये भूमिगत गटार योजनेसाठी ४.५४ लक्ष कर्जघेतले व व्याजसह ७.३४ लक्ष दाखवले आहे. कर्जघेतलेले दाखवले आहे.

मा. सभापती : कर्जप्रकरणामध्ये कार्यवाही होण्याची गरजआहे. नवीन कर्जवन टाईम कमीत कमी व्याजचे कर्जघ्यावे.

श्री. विनायक पांडे :पान क्र१४ ब मध्ये ३४ कर्मचारी अधिकारी यांचे सेवा निवृत्ती वेतन व कुटूंब निवृत्ती वेतन जस्त अदा करण्यात आले. असे दिले.

लेखाधिकारी : समायोजनासाठी लेखा परीक्षण विभागात पाठविले आहे. अंतिम तपासणी केलेले नाही.

डॉ. आशा बिनवडे : पान क्र ४० वर परिच्छेद ९,१० वर अदयाप अनुपालन अहवाल सादर झालेला नाही.

मा. आयुक्त : हे एकूण पाच ते सहा वर्षाचे आहे. यास शासनाकडून अनुदान येते संबधीत अधिकारी यांनी अनुदान आणण्यासाठी प्रयत्न केले नाही

मा.सभापती : या संदर्भात जेअधिकारी दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी.

डॉ. आशा बिनवडे : पान क्र ४१ वर परि. १२ मध्ये ९२ हजर ॲग्रीम घेतलेले आहे प्रत्यक्षात एवढा खर्च झालेला आहे की नाही.

प्र. मुख्य लेखा परीक्षक : आक्षेप काढून टाकण्यासाठी समायोजन करण्याची नोटीस दिलेली आहे.

श्री. मधुकर सावंत : यातच १६,७६५/- रू. अपहार केल्याचे दिले त्यांचेवर काय कार्यवाही केलेली आहे.

| | |
|---|---|
| मा. आयुक्त | : संबधीताचे स्पष्टीकरण घेतले जईल. त्यानंतरच योग्य ती कार्यवाही होईल. |
| डॉ. आशा बिनवडे | : परिच्छेद १३ मध्ये अभिलेखे उपलब्ध करून देत नाही म्हणून दिले. |
| मा. सभापती | : या संबंधी मा. आयुक्त यांनी संबधीतांना नोटीस देवून त्यानंतर कार्यवाही करावी. तसेच परीच्छेद १२ ते २४ पर्यत प्रकरणातील संचिका उपलब्ध करून दिल्या जत नाही त्या उपलब्ध करून दिल्या नाही तर मा. आयुक्तांनी संबधीतावर कार्यवाही करावी. |
| सौ. लता दलाल | : पान क्र.४३ वर क्र.२ मध्ये जर एक टॅबलेट ५० पैशाला येत असेल तर ६७ हजर पैकी १४ हजर टॅबलेट वाटल्या असे सांगण्यात आले. ५३ हजर टॅबलेट शिल्लक आहेत. |
| मा. आयुक्त | : फेब्रुवारी २००६ मध्ये त्यांनी अनुपालन सादर केले असे दिले. फक्त संचिका बघायची आहे. एक वर्ष पुर्ण झाले. इतका वेळ का लागला खुलासा करावा. |
| सौ.लता दलाल | : शंका आली म्हणूनच पुन्हा अनुपालन अहवाल मागविला असेल. एक हजर टॅबलेट जस्त आढळल्या असे दिले याचा अर्थ चुकीचा अनुपालन अहवाल सादर केला. यात पूर्ण घोटाळा आहे असे वाटते. |
| मा. सभापती | : या पूर्ण प्रकरणात गडबड वाटते. ही संचिका श्री.फड साहेब यांनी मागवून घेऊन सविस्तर खुलासा करावा. |
| मा. आयुक्त | : तीन दिवसात संचिका क्लिअर करावी. |
| श्री.मधुकर सावंत | : परिच्छेद १६ मध्ये सन २००३ पासून १ ते ९ *ध्ये विविध रक्का* उचल केलेल्या आहेत. आजपर्यंत समायोजन केलेले नाही. याबाबत काय कार्यवाही करणार. |
| मा. सभापती | : या प्रकरणात ज्या ज्या विभागाने संचिका आठ दिवसात दिली नाही त्या अधिकाऱ्याचे एक वेतनवाढ थांबविण्यात येईल. |
| मा. आयुक्त | : ज्या ज्या प्रकरणाच्या संचिका चौकशीसाठी मिळाल्या नाही तर एक एक वेतनवाढ थांबविण्यात येईल. समायोजन केल्यास वेतनवाढ पूर्ववत करण्यात येईल. |
| श्री.मधुकर सावंत | : प्रत्येक पानावर चर्चा केली तरच कार्यवाही होणार का? |
| श्री.रविकांत गवळी | : शिक्षण विभागात १३ प्रकरण काय झाले खुलासा करावा. |
| मा. आयुक्त | : १३ अनुपालन सबमीट केले होते. काय अनुपालन सादर केले, त्यात चुक कुणाची हे बघितले जईल. |
| शिक्षणाधिकारी | : १३ प्रकरणाचा अनुपालन अहवाल द्यायचा होता. त्यापैकी १२ प्रकरणाचा अनुपालन अहवाल लेखा परिक्षणाकडे पाठविला आहे. एक आक्षेप वगळला आहे असे कळाले. सर्व संचिका उपलब्ध करून दिल्या. त्याची पडताळणी चालू आहे. पुन्हा काही अहवाल येईल त्याप्रमाणे कार्यवाही करणार आहे. |
| श्री.रविकांत गवळी | : आपल्या कडे आलेले आहे. पुन्हा चर्चा करून निर्णय घेणे योग्य आहे. नुसती चर्चा करून अशी उत्तरे मिळत असेल तर योग्य नाही. |
| मा. आयुक्त | : पुर्तता केली आहे. लेखा परीक्षण विभाग त्यावर पुढील कार्यवाही करील. |
| शिक्षणाधिकारी | : मी कार्यरत झाल्यानंतर संचिका उपलब्ध करून दिल्या आहेत. |
| डॉ.आशा बिनवडे | : प्रकरण ३(दोन) मधील तरतूद ६(२) ८ नुसार हे कोणते कलम आहे. |
| मा. सभापती | : या कलमाची माहिती घ्यावी. एक तासासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ दुपारी २.१५ वा. दुपारी ३.१५ वाजता सभेला पुन्हा सुरूवात.) |

मा. सभापती : ब्लॅक बोर्ड बाबतीत अहवाल आला का?

प्र.मुख्य लेखा परिक्षक : याबाबत अनुपालन अहवाल आलेला आहे. तपासला नाही. दोन वेळेस खरेदी आहे एकाच रंगाची.

श्री.विनायक पांडे : पान ५१ क्र.३ एकाच कामासाठी एका वर्षात कोणतेही अंदाजपत्रक तयार न करता तांत्रिक अभिप्राय न घेता दोन वेगवेगळ्या संचिकाच्या माध्यातून नियमबाह्य साहित्य खरेदी केले ते रू.७३,५६०/- होते व संबंधीतास बील अदा करण्यात आले आहे. त्यामुळे हे साहित्य आवश्यक खरेदी करून २४ हजर रूपये संबंधीताकडून जमा करून मनपा फंडात जमा करणे आवश्यक वाटते असे दिले आहे.

मा. सभापती : अनुपालन अहवाल प्राप्त झाला आहे तो समाधानकारक नसेल तर सदर रक्कम संबंधीत अधिकाऱ्याकडून मनपाच्या तिजेरीत भरून घेण्यात यावी. अशा सूचना देण्यात येतात.

डॉ.आशा बिनवडे : परिच्छेद क्र.४ मध्ये पान क्र.५२ वर ८०० प्रती खरेदी केल्याबाबत परिच्छेद आहे. यात रांगोळी पुस्तक खरेदी करणे, किंमत रू.२५/- प्रमाणे १५% सूट जता रू.६३७५/- च्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. ही पुस्तके शालेय शिक्षणास आवश्यक नसताना का घेतली? घेणे गरजेचे होते का? त्यावर किंमत नाही. याकडे शिक्षण विभागाने दुर्लक्ष करून पुस्तके खरेदी केलेले आहे, असे दिले. यातच माहे फेब्रुवारी २००५ मध्ये अन्य संचिकेच्या माध्यमातून कलाकुसर याच पुस्तकाच्या ५०० प्रती वाचनालयासाठी खरेदी करण्याबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास १०.३.२००५ रोजे उप आयुक्त(प्रशासन) यांनी मान्यता दिली. तत्पुर्वी सांस्कृतिक अधिकारी यांनी १०० प्रती वाचनालयासाठी लागतात असा अभिप्राय दिला असतांना सुध्दा ५०० प्रतीची खरेदी झाली. तसे १०.३.२००५ रोजे संबंधीतास पुरवठा आदेश देण्यात आले. देयक किती देण्यात आले ते नमूद केलेले नाही. १७०००/- रूपये ही खरेदी मिना माळी, मनपा क.लिपिक यांचे मार्फत खरेदी केली ही बाब नियमबाह्य आहे. किंमत नसतांना १०%, १५% कमी कोणत्या बेसवर ठरविले? सदरचा आर्थिक व्यवहार संशयास्पद व नियमबाह्य असल्याचे म्हटले आहे. शिक्षण विभागाचे यावर काय मत आहे?

शिक्षणाधिकारी : या विभागाचे जे काही आक्षेप होते त्या बाबतीत तेंव्हाच अनुपालन अहवाल सादर केलेला आहे. जे काही खूलासा सादर केला तो पून्हा लेखा परीक्षण विभागात पाठविलेला आहे. यातून नियमाप्रमाणे कोणते अक्षेप वगळता येतील किंवा काय निर्णय लागणार आहे. पून्हा संचिका मागणी केली होती त्या उपलब्धही करून दिल्या आहे. जे काही अहवाल या विभागात येईल त्यानूसार कार्यवाही करण्यात येईल.

मा. सभापती : या बाबत प्र. मुख्य लेखा परीक्षक यांनी खूलासा करावा.

प्र.मुख्य लेखा परीक्षक : जे खूलासा मान्य करण्यासारखा असेल तो निश्चितपणे मान्य होईल. परीच्छेद ४ आहे त्याचा खूलासा मान्य करण्या सारखा नाही. तसेच परीच्छेद क्र ५ च्या बाबतीत रसीद तिकीटावर सही करून दिले नाही एवढाच मुद्दा आहे.

मा. सभापती :परिच्छेद क्र ४ च्या संदर्भात सदर क.लिपीक या महानगरपालिकेत काम करीत असल्यामुळे वसूली करू शकतो. जे काय रक्कम असेल ती त्यांचेकडून वसूल करण्यात यावी.

| | |
|---|---|
| डॉ. आशा बिनवडे | : परिच्छेद ५ मध्ये मूलांना शिष्यवृत्ती दिल्यानंतर वाटप पत्रावर त्या मूलाचे नाव किंवा पालकांचे अंगठ्याचा ठसा व स्वाक्षरी घेतलेली आहे. नेमके कोणत्या मूलांना दिले आहे हे कसे समजणार आहे. |
| मा. आयुक्त | : ऑडीट मध्ये ५०० रू. वर रसिद तिकीट लावून रक्कम द्यायला पाहिजेअसे अक्षेप घेतलेले आहे. |
| मा. सभापती | : यापूढे ५०० रू. च्या पूढे रसिद तिकिट लावल्याशिवाय रक्कम देण्यात येवू नये अशा सूचना देण्यात येतात. |
| डॉ. आशा बिनवडे | : परिच्छेद ७ मध्ये उन्हातल्या चांदण्या या पूस्तकांच्या १०० प्रती खरेदीसाठी ८००० रू. त्यातही असे दिले की श्री. सुनंदा गोरे हया महापालिकेच्या शाळेत सह शिक्षिका म्हणून कार्यरत आहे. |
| मा. सभापती | : यावर चर्चा करण्याची गरज नाही. संबधीत कर्मचारी यांचे प्रती परत करून त्यांचेकडून जे रक्कम दिली ती वसूल करण्यात यावी. |
| श्री. विनायक पांडे | : परिच्छेद ९ चा खूलासा घेण्यात यावा. |
| शिक्षणाधिकारी | : सर्व अक्षेपाचा अनुपालन अहवाल सादर केलेला आहे. |
| प्र.मुख्य लेखा परीक्षक | : मा. आयुक्तांची मान्यता घेवून खरेदी करावयास पाहिजेहोते. |
| डॉ. आशा बिनवडे | : पाच महिण्यात दोन वेळेस साहित्य खरेदी केले. |
| प्र. मुख्य लेखा परीक्षक | : सन २००४-०५ या आर्थिक वर्षासाठी भाडांर विभागाने निविदा मागविलेली होती. सदर निविदा मान्य होण्यासाठी एक ते दीड महिण्याचा कालावधी लागणार असून व शाळा १४ जूनला सूरू होत असल्याने त्या दृष्टीने शाळेच्या स्वच्छता होण्याच्या दृषटीने स्वच्छता सहित्याची निकड लक्षात घेवून खरेदीचा प्रस्ताव सादर करण्यात आला व उपआयुक्त प्रशासन यांची मान्यता घेण्यात आली. त्यामूळे निविदा मागविण्याची आवश्यकता नव्हती. कारण प्रकरणात अनियमीतता झाले असे सयुक्तीक वाटत नाही. |
| मा. सभापती | : दोन वेळेस साहित्य खरेदी केले एकदा निविदा काढून केले दुसऱ्यादा निविदा न काढता खरेदी केले. |
| डॉ. आशा बिनवडे | : पान क्र ५८ वरील ब वर खूलासा करावा. |
| शिक्षणाधिकारी | : यात जस्त दराने साहित्य खरेदी केल्याने ९१०९ /- इतक्या रक्कमेचे महापालिकेचे नूकसान झालेले आहे. असे म्हटले आहे. |
| लेखाधिकारी | : यात निविदा प्रक्रिया झालेली आहे. सन २००४-०५ चे जे दर आलेले होते त्या प्रमाणे खरेदी केलेले आहे. |
| डॉ. आशा बिनवडे | :खरेदी केलेल्या नोदी व शाळेत पूरवठा केलेल्या नोंदी यात मोठी तफावत आहे. पान क्र.५९ ड वर दिले की शिक्षण विभागाच्या भांडार विभागातील साठा रजिस्टरवर वाटप करण्यात आलेल्या साहित्याची बहुतंश नोंदी पेन्सीलने केलेल्या आहेत. कशासाठी पेन्सीलने नोंदी केल्या याचा खूलासा करावा. |
| मा. सभापती | : मुख्य लेखाधिकारी यांनी याचा अहवाल घेवून सभागृहासमोर ठेवावा ते लेखा परीक्षणाकडे पाठवून चूकीचे झाले असेल तर कार्यवाही करावी. |
| श्री.मुजेब खान | : पेन्सीलने नोंदी करण्याचे कारण काय याचा खूलासा करावा. |

डॉ. आशा बिनवडे : पान क्र ५९ मध्ये इ वर जे शाळेसाठी शिक्षण विभागातून साहित्य वाटप केले व शाळेत पूरवठा झालेले साहित्य यात मोठी तफावत असल्याचे म्हटले आहे. काही शाळेत रजिस्टरवर तर पूरवठा केल्याच्या नोंदीच नाही तर साहित्य गेले कूठे असा प्रश्न आहे. प्रत्यक्षात मी बघीतले काही शाळामध्ये स्वच्छता करण्यासाठी झाडू नाही खराटाने साफ करावे लागते. पहिला कॉलम बघीतला तर शाळेला काहीच साहित्य प्राप्त नाही एका ओळीत दिलेले आहे.

शिक्षणाधिकारी : स्वच्छता साहित्य वाटप केलेले आहे. परंतू काही ठिकाणी पेन्सीलने नोंदी घेतल्याचा अक्षेप होता. ज्यांनीसाहित्य घेवून गेले त्यांची स्वाक्षरी आहे.

मा. आयुक्त : ज्यावेळी पेमेन्ट दिले जते त्यावेळी मुख्याध्यापक किंवा तेथील जे प्रमूख कूणी असेल त्यांची सही घेतली जते की इतके साहित्य पोहचले त्यामूळे साहित्य पूरवठा करण्यामध्ये तफावत होवू शकत नाही. याचा अर्थ एकच होवू शकतो की साहित्य घेवून गेल्यानंतर रजिस्टरला नोंद केली नसेल. किंवा साहित्य मिळाल्याची सही ही चूकीची असू शकते. हे बघावे लागेल की पेमेन्ट देते वेळी त्या शाळेतील मुख्याधयापकाची सही आहे काय.

श्री.संजय शिरसाट : पेमेन्टचा प्रश्न येत नाही. यात शाळेचे नाव दिले केंद्रीय प्राथमीक शाळा एन-७ शाळेत झाडू शिक्षण भांडार विभागातून २५ दिले. शाळांना प्राप्त १० नग शिक्षण भांडार विभागातून वाटप. ४५ शाळांना प्राप्त साहित्यामध्ये प्राप्त नाही असे दाखवले आहे.

मा. आयुक्त : यात साहित्य वाटप केले ज्यांनी वाटप केले त्यांना सही मिळाली एक तर शाळे रजिस्टर मेंन्टन केले नाही दूसरे संगनमताने हे केले असावे.

श्री.मुजेब खान : भांडार विभागाकडून १० नग दिल्यानंतर ज्यांनी साहित्य घेवून गेले ते शाळेत ४ नग देतात. बाकीचे गायब करतात.

सौ. लता दलाल : शिक्षण विभागाचे एक क्लर्क तेथे साहित्य वाटप करीत असे. साहित्य दिल्याची नोंद पेन्सीलने घेणे व त्यानंतर वाटेलतशी दूरूस्ती पेनने करणे असा हा प्रकार केलेला दिसून येतो. संगनमताने हा भ्रष्टाचार केलेला आहे याची चौकशी व्हावी.

मा.सभापती : या बाबत शिक्षणाधिकारी यांनी खोलात जवून चौकशी करून अहवाल सादर करावा.

श्री.विनायक पांडे : ज्यांची त्या विभागातून बदली झाली होती. त्यांना पून्हा त्याच विभागात दिले गेले. त्यांचेच हे काम झालेले आहे.

श्री.संजय शिरसाट : परिच्छेद क्र १३ मध्ये स्थायी समितीची मान्यता का घेतलेली नाही.

शिक्षणाधिकारी : १० लक्ष च्या वर खरेदी केले असते तर स्थायी समिती समोर आले असते. दर मान्य असल्याने व आवश्यकतेनूसारच खरेदी केलेले आहे.

श्री.मुजेब खान : पहिल्या वर्षी ज्यांचेकडून खरेदी केले दुसऱ्या वर्षीही त्यांचेकडूनच असे अनेक वेळा होते.

डॉ.आशा बिनवडे : निविदा एकच होती दोन लोकांनी रेट दिल्यानूसार खरेदी केले.

श्री.मधुकर सावंत : पान क्र ६५ वर भविष्य निर्वाह निधी लेख तपासणीतील अनियमितता झाल्याचे दिले आहे. रू.६३९८८ ची तफावत झाल्याचे म्हटले आहे.

प्र.मुख्य लेखा परीक्षक : बँक रिकन्सलेशन जे केलेले आहे जीपीएफ रक्कमेमध्ये फरक आलेला आहे. अनुपालनाची गरजनाही जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करणे आवश्यक आहे.

मा. सभापती : शिक्षणाधिकारी यांनी या प्रकरणात जबाबदारी निश्चित करून काय जबाबदारी निश्चित केली या बाबतचा अहवाल या सभागृहासमोर सादर करावा.

श्री.मधुकर सावंत : पान क्र ६९ वर जनसंपर्क विभागाच्या संदर्भात आहे जहिरातीचे देयके ठरल्याप्रमाणे दिलेले नाही. का जस्तीचे अदा करण्यात आलेले आहे.

प्र.जनसंपर्क अधिकारी : परिच्छेद क्र. १ मध्ये वाढीव परीमाणामूळे झालेल्या अति प्रदाना बाबत जेदिले आहे स्थानीक उर्दू दैनिकांना देण्यात येणाऱ्या ३० टक्के जदा जगे बाबतचा अतिप्रधान उर्दू दैनिकांना जहिरांतीसाठी ३० टक्के अतिरिक्त जगेची सूट देण्याची पध्दत यापूर्वी होती. ती सप्टेंबर २००५ पासून रद्द करण्यात आलेली आहे. आता शासन मान्य दराने उर्दू दैनिकांना जहिरात दयावी लागते.

मा. आयुक्त : १९८९ मध्ये उर्दू दैनिकासाठी ३० टक्के जस्त जगा देण्याची सूट मा. आयुक्तांनी त्यावेळी दिली होती. उर्दू भाषेत पूर्वी लाईनवर देत होतो. सप्टेंबर पासून डिसकन्टीन्यू केले आहे. कारण ९९ टक्के हे संगणकावर होते. आता येरीयावर देतो. जस्त जगा लागत असेल तर त्याप्रमाणे रक्कम मिळते.

प्र.जनसंपर्क अधिकारी : दै. महाराष्ट टाईम्स व दै. लोकसंत्ताच्या बाबतीत अक्षेप आहे.सन २००३ ते २००५ च्या कालावधीत मा. आयुक्तांची मान्यता घेवून या दैनिकांना जहिराती प्रदान करण्यात आल्या होत्या. त्याची देयके सूध्दा मा.आयुक्तांच्या मान्यतेने दिलेली होती. प्रती कॉलम सेन्टीमीटर प्रमाणे जहिराती दिल्या व त्या दैनिकांनी स्क्वेअर सेन्टीमीटर देयके दिली होती. कॉलम से. मी. म्हणजेसींगल कॉलम स्क्वेअर से. मी. म्हणजेचार पट असा त्या अर्थ होतो. कॉलम स्वेअर से. मी प्रमाणे देयक दिले परंतू ते कॅल्क्यूलेट केले तर कॉलम से.मी.च्या प्रमाणे दर येतात. आता स्क्वेअर से.मी. प्रमाणे दैनिकांना जहिराती प्रदान करण्यात येत आहे. या बाबतचा अहवाल लेखा परीक्षण विभागात सादर केलेला आहे.

श्री. मधुकर सावंत : पान क्र ६९ वर क्र३ मध्ये ८५,४१० रू. जस्त कशामूळे दिले गेले.

मा. आयुक्त : अहवाल दिलेला आहे. प्रोसेस अशी की त्यांनी येवून संचिका काढाव्या तपासून घ्याव्या अक्षेप असेल तर अनुपालन अहवाल काढुन घ्यावा.

प्र.मुख्य लेखा परीक्षक : परिच्छेद २ बाबतचा खूलासा केलेला लेखा परीक्षण विभागास मान्य आहे.

श्री.मिलींद दाभाडे : जे चर्चा चालू आहे त्यापेक्षा वेगळी चर्चा करणार आहे. परवानगी घेतो. या देशाला ज्या महापुरूषाने राज्यघटना दिली.असे महापुरूष डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचा विदयापीठ गेट समोर पुतळा उभारण्यात आला होता. तो **ब्राँझ** असल्याचे महानगरपालिकेने भासवले. परंतू तो **ब्रॉझ** आहे की नाही हा प्रश्न प्रत्येक पावसाळयामध्ये समोर येतो. पावसाळयात त्या पुतळयाच्या खिलच्या निघून त्याचे विद्रुपीकरण होते. शहरातील इतर अनेक पूतळयाचे असे होत नाही. पाच ते सहा वर्षापूर्वीचा पुतळा आहे. पावसाने त्यांचे खिलच्या निघतात. त्यामूळे संपूर्ण आंबेडकरी जनतेच्या भावना दुखावत आहे. विटबंना होत आहे. या पुतळयात मोठा भ्रष्टाचार होवून यात श्री. एमडी. सोनवणे व सी. एस सोनी साहेब हे दोघे जबाबदार आहे. त्यांचेवर कार्यवाही केली नाही तर आम्ही लोक अंदोलन करू तसेच सभा होवू

देणार नाही. सभा १० मिनिटासाठी तहकूब करावी आपण प्रत्यक्ष पाहणी करावी. काल मी निवेदन दिल्यामूळे आज लगेच रंगाचे तेथे काम सुरू केले आहे. ब्रॉंझ च्या पुतळयाला रंग देत नाही. त्याची पॉलीश केली जते. परंतू दरवर्षी तेथे रंग लावण्यात येतो. म्हणून विंटबना करणाऱ्या अधिकाऱ्याचा मी निषेध करतो आणि त्यांचेवर कडक कार्यवाही करण्याची मागणी करीत आहे.

श्री.मधुकर सावंत : महत्वाचा प्रश्न मांडला आहे. तो सर्व समाजच्या हिताचा प्रश्न आहे.लगेच पाहणी करावी काही चूकीचे आढळून आले तर संबधीत अधिकाऱ्यावर कार्यवाही करावी.

श्री.विनायक पांडे : हा पूतळा माझ्या घराच्या बाजूलाच असून तेथे सर्व देशातून लोक येत असतात. जर त्या पुतळयाच्या खिलच्या निघत असेल तर चांगली दुरूस्ती करून घ्यावी अशी विनंती आहे.

श्री.मुधकर सावंत : आणखी लेखा परीक्षण अहवाल खूप बाकी आहे. त्यावर चर्चा करण्यासाठी १७ किंवा १८ जनेवारी रोजी बैठक आयोजित्त करावी.

डॉ. आशा बिनवडे : मालमत्ता विभागाचा अहवाल तसेच नोकर भरती अहवालावर एकत्रीत चर्चा करता येईल.

मा. सभापती : आजची सभा तहकूब करण्यात येवून सभेची तारीख व वेळ निश्चित करून सदस्यांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

या बरोबरच सभा तहकूब केल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**स्थायी समिती सभा**

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक (16)**

**दिनांक :- 06/12/2006**

## सू च ना

गुरूवार दिनांक 07/12/2006 रोजी सकाळी 11.30 वाजता आयोजित करण्यात आलेली **स्थायी समितीची सभा काही अपरिहार्य कारणामुळे पुढे ढकलण्यात येत आहे. सभेची पुढील तारीख व वेळ स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.**

नगर सचिव

महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**स्थायी समिती सभा**

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक (16)**

**दिनांक :- 19/12/2006**

## सू च ना

दिनांक 07/12/2006 रोजी पुढे ढकण्यात आलेली स्थायी समितीची सभा आता **बुधवार दि.27 डिसेंबर 2006 रोजी सकाळी 11.30 वाजता** "सन 2005-2006 च्या वार्षिक लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणेसाठी" 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सभेची विषयपत्रिका (कार्यक्रम पत्रिका क्र.16) यापुर्वीच वक्तशीर वितरीत करण्यात आलेली आहे. कृपया सभेच्या तारखेतील बदल लक्षात घ्यावा व या सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**स्थायी समिती सभा**

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक (16)**

**दिनांक :- 08/01/2007**

## सू च ना

दिनांक 27/12/2006 रोजी पुढे ढकलण्यात आलेली स्थायी समितीची सभा आता **शुक्रवार दि.12 जानेवारी 2007 रोजी सकाळी 11.30 वाजता** "सन 2005-2006 च्या वार्षिक लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणेसाठी" 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सभेची विषयपत्रिका (कार्यक्रम पत्रिका क्र.16) यापुर्वीच वक्तशीर वितरीत करण्यात आलेली आहे. कृपया सभेच्या तारखेतील बदल लक्षात घ्यावा व या सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

नगर सचिव

महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>स्थायी समिती सभा</u>**

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक (16)**

(दि.12/1/2007 रोजीची तहकूब सभा)

**<u>दिनांक :- 19/01/2007</u>**

## <u>सू च ना</u>

दिनांक 12/1/2007 रोजी **तहकुब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा** आता **गुरूवार <u>दि. 25 जानेवारी 2007 रोजी सकाळी 11.30 वाजता</u>** "सन 2005-2006 च्या वार्षिक लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणेसाठी" 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सभेची विषयपत्रिका (कार्यक्रम पत्रिका क्र.16) यापुर्वीच वक्तशीर वितरीत करण्यात आलेली आहे. कृपया या सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>स्थायी समिती सभा</u>**

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक (16)**

(दि.12/1/2007 रोजीची तहकूब सभा)

**<u>दिनांक :- 22/01/2007</u>**

## <u>सू च ना</u>

दिनांक 12/1/2007 रोजी तहकुब करण्यात आलेली व गुरूवार दि. 25/1/2007 रोजी आयोजित करण्यात आलेली **स्थायी समितीची सभा काही अपरिहार्य कारणामुळे पुढे ढकलण्यात येत असून,** ही सभा आता **<u>शुक्रवार,</u> <u>दिनांक 02 फेब्रुवारी 2007 रोजी सकाळी 11.30 वाजता</u>** ''सन 2005-2006 च्या वार्षिक लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणेसाठी'' 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सभेची विषयपत्रिका (कार्यक्रम पत्रिका क्र.16) यापुर्वीच वक्तशीर वितरीत करण्यात आलेली आहे. कृपया या सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**स्थायी समिती सभा**

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक (16)**

**दिनांक :- 01/02/2007**

## सू च ना

शुक्रवार दिनांक 02/02/2007 रोजी सकाळी 11.30 वाजता “सन 2005-2006 च्या वार्षिक लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणेसाठी” आयोजित करण्यात आलेली **स्थायी समितीची सभा काही अपरिहार्य कारणामुळे पुढे ढकलण्यात येत आहे. सभेची पुढील तारीख व वेळ स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.**

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद